---

# *** नोटिस ***

---

**बँकेच्या एक किंवा अधिक खात्यामधून खातेदाराने एका आर्थिक वर्षामध्ये रू.१ कोटी पेक्षा जास्त रोख रक्कम उचल केल्यास रू.१ कोटी वरील रक्कमेमधून २ टक्के प्रमाणे आयकर कपात करणेसंबंधी कलमामध्ये महत्त्वाचे व दूरगामी बदल / सुधारणा.**

<u>अर्थकायदा २०२० नुसार कलम १९४ एन मध्ये नविन बदल मंजूर झालेमुळे कायदयाची लागू तुलनात्मक परिस्थिती खालीलप्रमाणे आहे. येथे केवळ मुख्य बदलाची माहिती दिली असून करकपात व करभरणा पध्दती गतवर्षीप्रमाणे अंमलात राहतील.</u>

| **क्र.** | **कलमामधील तरतूदीचा अर्थ व अंमलबजावणी दि.०१/०४/२०२० ते दि.३०/०६/२०२० पर्यंत अर्थकायदा २०१९ नुसार दि.०१ सप्टेंबर, २०१९ पासून लागू** | **उपकलमामधील तरतूदीची अर्थ व अंमलबजावणी दि.०१/०४/२०२० ते दि.३१/०३/२०२१ पर्यंत अर्थकायदा २०२० नुसार दि.०१ जुलै, २०२० पासून लागू** |
|---|---|---|
| | | |
| १. उचल मर्यादा तरतूद | आयकर कायदा १९६१ कलम १९४ एन नुसार बँकेच्या खातेदाराने सर्व शाखेतील बँके खात्यातून एका आर्थिक वर्षामध्ये रू.१ कोटी मर्यादेपेक्षा जास्त रोख रक्कम उचल केल्यास जादा उचल रक्कमेमधून २ टक्के प्रमाणे आयकर कपात करावी लागेल. | आयकर कायदा १९६१ कलम १९४ एन नुसार बँकेच्या खातेदाराने सर्व शाखेतील बँके खात्यातून एका आर्थिक वर्षामध्ये विहित मर्यादे पेक्षा जास्त रोख रक्कम उचल केल्यास जादा उचल रक्कमे मधून २ टक्के किंवा ५ टक्के प्रमाणे आयकर कपात करावी लागेल. |
| | | |
| २. विहित उचल मर्यादा रक्कम | आर्थिक वर्षमध्ये एका किंवा अधिक बँक खात्यातून (One or More accounts maintained by the receipient) रोखीने काढलेली रक्कम विहित मर्यादे जास्त झालेस आयकर कपात करण्याची जबाबदारी सुरू होते.<br><br>**विहीत मर्यादा –**<br><br>**सर्व खातेदार – रू.१ कोटी** | आर्थिक वर्ष मध्ये एका किंवा अधिक बँक खात्यातून (One or More accounts maintained by the receipient) रोखीने काढलेली रक्कम रूपये विहीत मर्यादिपेक्षा जास्त झालेस आयकर कपात करण्याची जबाबदारी सुरू होते.<br><br>**विहीत मर्यादा –**<br>**नियमित आयकर विवरणपत्रके दाखल करणारा खातेदार**<br>(ज्याने आर्थिक वर्ष २०१८-१९, २०१७-१८, २०१६-१७ या सर्व वर्षाची आयकर विवरणपत्रके दाखल केली आहेत असा खातेदार)<br>**मर्यादा रू.१ कोटी** |

<table>
<tr><td></td><td></td><td>अनियमित आयकर विवरणपत्रके दाखल करणारा खातेदार<br>(ज्याने आर्थिक वर्ष २०१८-१९, २०१७-१८, २०१६-१७ या सर्व वर्षाची आयकर विवरणपत्रके दाखल केली नाहीत असा खातेदार)<br>मर्यादा रू.२० लाख.</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>३. करपात्र उचल मर्यादेनुसार आयकर कपात दर</td><td>
<table>
<tr><th>सर्व खातेदार</th><th>आयकर कपात दर</th></tr>
<tr><td>0. रोख उचल रू.१०० कोटी पर्यंत</td><td>काही नाही</td></tr>
<tr><td>१. रोख उचल रू.१ कोटी पेक्षा जास्त झालेस आयकर कपात</td><td>२ टक्के आयकर कपात</td></tr>
</table>
</td><td>
<table>
<tr><th>नियमित आयकर विवरणपत्रके दाखल करणारा खातेदार</th><th>आयकर कपात दर</th></tr>
<tr><td>0. रोख उचल रू.१ कोटी पर्यंत</td><td>काही नाही</td></tr>
<tr><td>१. रोख उचल रू.१ कोटी पेक्षा जास्त झालेस आयकर कपात</td><td>२ टक्के आयकर कपात</td></tr>
</table>
<table>
<tr><th>अनियमित आयकर विवरणपत्रके दाखल करणारा खातेदार</th><th>आयकर कपात दर</th></tr>
<tr><td>0. रोख उचल रू.२० लाख पर्यंत</td><td>काही नाही</td></tr>
<tr><td>१. रोख उचल रू.२० लाख पेक्षा जास्त परंतू १ कोटी पर्यंत झालेस</td><td>२ टक्के आयकर कपात</td></tr>
<tr><td>२. रोख उचल रू.१ कोटी पेक्षा जास्त झालेस आयकर कपात</td><td>५ टक्के आयकर कपात</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>४. करपात्र उचल मर्यादा कशी मोजावी</td><td>१. आर्थिक वर्षामध्ये एका बँक खात्यातून रोखीने उचल केलेल्या रक्कमेपैकी सुरूवातीचा रू.१ कोटी रक्कम वजा करून त्यापुढील प्रत्येक उचल रक्कमेमधून २ टक्के प्रमाणे आयकर कपात करावी.</td><td>१. आर्थिक वर्षामध्ये एका बँक खात्यातून रोखीने उचल केलेल्या रक्कमेपैकी सुरूवातीचा लागू विहित मर्यादा रू.१ कोटी रू. १ कोटी/रू.२० लाख अशी रक्कम वजा करून त्यापुढील प्रत्येक उचल रक्कमेमधून २ टक्के किंवा ५ टक्के प्रमाणे आयकर कपात करावी.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | २. आर्थिक वर्ष २०२०-२१ करिता दि.०१/०४/२०२० ते ३०/०६/२०२० या कालावधीमध्ये केलेली उचल विचारात घेऊन रूपये एक कोटी मर्यादा मोजली पाहीजे. सदर रू.१ कोटी मर्यादा दि.३० जून,२०२० पुर्वी पूर्ण झाली असेल तर त्या दिवसापासून दि.३० जून, २०२० या दिवसापर्यंत पुढील प्रत्येक उचल रक्कमेमधून २ टक्के प्रमाणे आयकर कपात करावी. | २. अ) सर्व खातेदारासाठी आर्थिक वर्ष २०२०-२१ करिता दि.०१/०४/२०२० ते पुढील कालावधीमध्ये केलेली उचल विचारात घेऊन लागू मर्यादा रू.१ कोटी मर्यादा पाहीजे. सदर रू.१ कोटी मर्यादा दि.३० जून,२०२० पुर्वी पूर्ण झाली असेल तर त्या दिवसापासून पुढील प्रत्येक उचल रक्कमेमधून २ टक्के प्रमाणे आयकर कपात करावी.<br>ब) अनियमित आयकर विवरणपत्रके दाखल करणा-या खातेदारासाठी आर्थिक वर्ष २०२०-२१ करिता दि.०१/०४/२०२० ते पुढील कालावधीमध्ये केलेली उचल विचारात घेऊन लागू मर्यादा रू.२० लाख मोजली पाहिजे. रू.२० लाख ही मर्यादा दि.३० जून,२०२० पुर्वी पूर्ण झाली असेल तर दि.०१ जुलै, २०२० या दिवसापासून पुढील प्रत्येक उचल रक्कमेमधून २ टक्के/५ टक्के प्रमाणे आयकर कपात करावी. |

खातेदार सभासद आहे म्हणुन आयकर कपातीच्या तरतूदीमधून माफी मिळणार नाही. तसेच खातेदार सहकारी संस्था आहे म्हणून कर कपातीच्या तरतूदीमधून माफी मिळणार नाही. सदर आयकर कपात होऊ नये म्हणून फॉर्म १५ एच किंवा १५ जी घेता येत नाही.